मत्स्यव्यवसाय विभागातील
स्थायी/अस्थायी पदांचा
<u>सुधारित आकृतीबंध निश्चित करणे</u>

महाराष्ट्र शासन
कृषी,पशुसंवर्धन,दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग
शासन निर्णय क्र. मत्स्यआ-२००७/प्र.क्र. ७१/पदुम-१२
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२
दिनांक : १२ नोव्हेंबर, २००७

वाचा :- १) शा.नि.कृषि व पदुम विभाग क्र.मत्स्यआर२००६/प्र.क्र ८३/पदुम-१२,दि.३०.३.२००७
२) शा.नि.वित्तविभाग क्र.टिईपी- २००२/प्र.क्र. १३/सेवा-३, दि.२१ जून २००६,
३) आयुक्त, मत्स्यव्यवसाय यांची पत्रे जा.क्र.मत्स्य/प्रशा/१४११०२/४४/२००७,
दि. १०.४.२००७ व जा.क्र.मत्स्य/प्रशा/१४११०२/५०/२००७,दि. १०.४.२००७.

**<u>प्रस्तावना :-</u>**

कृषि व पदुम विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील व आयुक्त, मत्स्यव्यवसाय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या अधिपत्याखालील मत्स्यव्यवसाय विभागाच्या क्षेत्रिय यंत्रणेतील सर्व पदांचा आढावा मा. मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली उच्च स्तरीय सचिव समितीने दिनांक ५ जून, २००६ रोजी झालेल्या बैठकीत घेतला असून १०५० पदांचा सुधारित आकृतीबंध या विभागाच्या दिनांक ३० मार्च २००७ च्या शासन निर्णयान्वये निश्चित केला आहे. वित्त विभागाच्या उपरोक्त दिनांक २१.६.२००६ च्या शासन निर्णयानुसार ज्या मंत्रालयीन व प्रशासकीय विभागानी त्यांच्या आस्थापनेवरील पदांचा आढावा पूर्ण केला आहे व आढाव्याअंती निश्चित केलेल्या आकृतीबंधास मुख्य सचिव समितीची मान्यता घेऊन त्यासंबंधिचा शासन निर्णय निर्गमित केला आहे, अश्या प्रशासकीय विभागांना त्यांच्या अधिपत्याखाली एकूण पदांच्या ८० टक्के पदे कायम करण्यास मान्यता दिली आहे. उपरोक्त शासन निर्णयासोबतच्या विवरणपत्रात नमूद केल्यानुसार आयुक्त मत्स्यव्यवसाय यांनी संदर्भाधिन पत्रान्वये या विभागाकडे प्रस्ताव सादर केला आहे.

**<u>शासन निर्णय :-</u>**

वित्त विभागाने प्रदान केलेल्या शक्तींचा वापर करुन कृषि व पदुम विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली व आयुक्त मत्स्यव्यवसाय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या अधिपत्याखालील मत्स्यव्यवसाय विभागाच्या क्षेत्रिय यंत्रणेतील सर्व १०५० पदांपैकी ८० टक्के म्हणजेच ८४० पदांना स्थायी व उर्वरित २१० पदांना अस्थायी म्हणून **<u>समजण्यास दिनांक १ नोव्हेंबर, २००७ पासून शासनाची मान्यता देण्यात येत आहे.</u>**

२. मत्स्यव्यवसाय विभागातील एकूण १०५० पदांपैकी ८४० पदे स्थायी व २१० पदे अस्थायी असून सुधारीत स्थायी/अस्थायी आकृतीबंधाचा संवर्गनिहाय तपशिल सोबतच्या **परिशिष्ट अ** मध्ये दर्शविण्यात आला आहे. या विवरणपत्रातील स्तंभ - ९ मध्ये नमूद केलेली सर्व पदे दिर्घकाळ चालू रहाणारी असल्याने कायम पदे म्हणून दर्शविण्यात आलेली आहेत. या विभागाच्या नव्याने निर्माण होणा-या जसे मुंबई शहर, नंदुरबार, लातूर, हिंगोली व वाशिम या कार्यालयातील पदाचा स्थायी पदात समावेश करण्यात आलेला नाही. तसेच एकाकी पदांना ८० टक्के निकष लावता येत नसल्याने ही पदे स्थायी करण्यात येत आहेत.

३. मत्स्यव्यवसाय विभागातर्गत यापूर्वी राबविण्यात येत असलेल्या सर्व योजनांतर्गत निर्माण करण्यात आलेल्या सर्व पदांचा समावेश "मुख्य कार्यालय व प्रादेशिक कार्यालये" व "जिल्हा कार्यालये" या दोन योजनांमध्ये करण्यात आला आहे. योजनानिहाय व कार्यालयनिहाय स्थायी/अस्थायी पदांचा तपशील नव्याने निर्माण करावयाच्या ५ कार्यालयास मान्यता प्राप्त झाल्यावर निर्गमित करण्यात येईल.

४. मत्स्यव्यवसाय विभागाच्या सुधारित आकृतीबंधानुसार निश्चित करण्यात आलेल्या पदांचे वेतन व भत्यामधील खर्च यापूर्वी ज्या लेखाशिर्षातून खर्ची टाकण्यात येत होता, त्याच लेखाशिर्षाखाली यापूढेही खर्ची टाकण्यात यावा.

५. अन्यथा स्वतंत्र आदेश निर्गमित नसल्यास या शासन निर्णयाद्वारे निश्चित करण्यात आलेल्या सुधारित आकृतीबंधामुळे केद्रशासन पुरस्कृत योजना/यंत्रणाच्या कार्यपध्दतीत कोणताही बदल करण्यात आलेला नाही

६. सुधारित आकृतीबंधानुसार अंतिमत: मान्य केलेल्या स्थायी / अस्थायी पदांच्या संख्येस अधीन राहून पद रचनेत बदल करण्याचे अधिकार प्रशासकीय विभागास राहतील.

७. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या दि.२१ जून २००६ च्या शासन निर्णयानुसार प्रशासकिय विभागास प्रदान केलेल्या शक्तींच्या अधिन राहून निर्गमित करण्यात येत आहे.

८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर अपलोड करण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्रमांक २००७१११२१८३५१७००१ असा आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने**

( म.ह.सोनकुसरे )
उप सचिव, महाराष्ट्र शासन,
कृषि,पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग.

प्रति,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव,

२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
३. मा.उप मुख्यमंत्री यांचे सचिव,
४. मा.मंत्री (पदुम) यांचे खाजगी सचिव,
५. मा.राज्यमंत्री (पदुम) यांचे खाजगी सचिव,
६. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई-३२,
७. प्रधान सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२,
८. सचिव (प्र.सु.व र.व का.), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई
९. सचिव (व्यय), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
१०. वित्त विभाग (व्यय-१/वित्तीय सुधारणा-१), मंत्रालय, मुंबई,
११. सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई,
१२. आयुक्त (मत्स्यव्यवसाय), महाराष्ट्र राज्य, मुंबई,
१३. प्रादेशिक मत्स्यव्यवसाय उपसंचालक, मुंबई, नाशिक, नागपूर, पुणे, अमरावती, औरंगाबाद (आयुक्त,मत्स्यव्यवसाय यांचे मार्फत),
१४. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर,
१५. महालेखापाल (लेखापरिक्षा), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर,
१६. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
१७. निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई,
१८. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी (आयुक्त,मत्स्यव्यवसाय यांचे मार्फत),
१९. उप कोषागार अधिकारी, कोकण भवन, नवी मुंबई (आयुक्त,मत्स्यव्यवसाय यांचे मार्फत),
२०. पदुम विभागातील सर्व कार्यासने
२१. निवड नस्ती, पदुम-१२.

## विवरणपत्र अ

शासन निर्णय, क्र.मत्स्यआ-२००७/प्र.क्र.७९/पदुम-१२, दि.१२ नोव्हेंबर २००७ चे सहपत्र.

| अ. क्र. | संवर्ग पदनाम | एकूण पदे | कायम पदे | फेब्रुवारी अखेर तीन किंवा अधिक वर्षे पूर्ण होणारी व कायम स्वरूपाच्या दीर्घकाळ चालू राहणाऱ्या कामासाठी आवश्यक पदे | फेब्रुवारी अखेर १ वर्षाहून अधिक परंतु ३ वर्षांपेक्षा कमी काळ अस्तित्वात असलेली पदे | बाकीची पदे | ४,५,६ स्तंभातील एकूण पदांच्या ८० टक्के पदे | कायम करावयाची पदे (स्तंभ ८ उणे स्तंभ ४) स्तंभ ५ मधील संख्येपेक्षा अधिक नसावी | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| १ | आयुक्त (भाप्रसे) | १ | ० | १ | ० | ० | १ | १ | |
| २ | सह आयुक्त मत्स्य | ३ | ० | ३ | ० | ० | १ | १ | |
| ३ | सह आयुक्त मत्स्य (प्रशा) | १ | ० | १ | ० | ० | १ | १ | |
| ४ | उपआयुक्त मत्स्य (अर्थ व नियोजन) | १ | ० | १ | ० | ० | १ | १ | |
| ५ | प्रादेशिक उपआयुक्त मत्स्य | ७ | ० | ७ | ० | ० | ६ | ६ | |
| ६ | कार्यकारी अभियंता | १ | ० | १ | ० | ० | ० | ० | |
| ७ | सहा. आयुक्त (तांत्रिक) | ३९ | ० | ३९ | ० | ० | २९ | २९ | |
| ८ | प्रकल्प व्यवस्थापक (दापचरी) | १ | ० | १ | ० | ० | १ | १ | |
| ९ | सहा. आयुक्त मत्स्य (प्रशा) | १ | ० | १ | ० | ० | १ | १ | |
| १० | सहा.आयुक्त मत्स्य (कर्ज व वसुली) | १ | ० | १ | ० | ० | १ | १ | |
| ११ | उपनिबंधक सह.संस्था (मत्स्य) | १ | ० | १ | ० | ० | १ | १ | |
| १२ | उप आयुक्त (सांख्यिकी) | १ | ० | १ | ० | ० | १ | १ | |
| १३ | लेखा अधिकारी (Finance) | १ | ० | १ | ० | ० | १ | १ | |
| १४ | मत्स्य विकास अधिकारी | ४८ | ० | ४८ | ० | ० | ३६ | ३६ | |
| १५ | मत्स्य प्रशिक्षण अधिकारी | ६ | ० | ६ | ० | ० | ५ | ५ | |
| १६ | अभिरक्षक | १ | ० | १ | ० | ० | १ | १ | |
| १७ | प्रशिक्षण व विस्तार अधिकारी | १ | ० | १ | ० | ० | १ | १ | |
| १८ | प्रशासकीय अधिकारी | ८ | ० | ८ | ० | ० | ६ | ६ | |
| १९ | नियोजन अधिकारी | १ | ० | १ | ० | ० | १ | १ | |
| २० | अर्थसंकल्प अधिकारी | १ | ० | १ | ० | ० | १ | १ | |
| २१ | वसुली अधिकारी | ६ | ० | ६ | ० | ० | ५ | ५ | |

| अ. क्र. | संवर्ग पदनाम | एकूण पदे | कायम पदे | फेब्रुवारी अखेर तीन किंवा अधिक वर्षे पूर्ण होणारी व कायम स्वरुपाच्या दीर्घकाळ चालू राहणाऱ्या कामासाठी आवश्यक पदे | फेब्रुवारी अखेर १ वर्षाहून अधिक परंतु ३ वर्षापेक्षा कमी काळ अस्तित्वात असलेली पदे | बाकीची पदे | ४,५,६ स्तंभातील एकूण पदांच्या ८० टक्के पदे | कायम करावयाची पदे (स्तंभ ८ उणे स्तंभ ४) स्तंभ ५ मधील संख्येपेक्षा अधिक नसावी | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| २२ | सांख्यिकी अधिकारी (Statistic) | १ | ० | १ | ० | ० | १ | १ | |
| २३ | परिरक्षण अभियंता | १ | ० | १ | ० | ० | १ | १ | |
| २४ | लघुलेखक (उच्चश्रेणी) मराठी/इंग्रजी | २ | ० | २ | ० | ० | २ | २ | |
| २५ | लघुलेखक (निम्नश्रेणी) मराठी/इंग्रजी | ४ | ० | ४ | ० | ० | ३ | ३ | |
| २६ | अधिक्षक | २७ | ० | २७ | ० | ० | २२ | २२ | |
| २७ | मत्स्यक्षेत्र निरिक्षक | १५ | ० | १५ | ० | ० | १२ | १२ | |
| २८ | निरिक्षक सांख्यिकी | ३ | ० | ३ | ० | ० | २ | २ | |
| २९ | सहाय्यक सांख्यिकी (Statistic) | ३ | ० | ३ | ० | ० | २ | २ | |
| ३० | सहाय्यक सांख्यिकी (Statistic) भू | १ | ० | १ | ० | ० | १ | १ | |
| ३१ | यांत्रिकी निदेशक | ६ | ० | ६ | ० | ० | ५ | ५ | |
| ३२ | लेखापाल (Finance) | १ | ० | १ | ० | ० | १ | १ | |
| ३३ | सहकार अधिकारी | २ | ० | २ | ० | ० | १ | १ | |
| ३४ | सहा. मत्स्य विकास अधिकारी | १७० | ० | १७० | ० | ० | १३६ | १३६ | |
| ३५ | कनिष्ठ चित्रकार | १ | ० | १ | ० | ० | १ | १ | |
| ३६ | आरेखक | १ | ० | १ | ० | ० | १ | १ | |
| ३७ | कनिष्ठ अभियंता | २ | ० | २ | ० | ० | २ | २ | |
| ३८ | सांख्यिकी सहाय्यक (Statistic) | २ | ० | २ | ० | ० | २ | २ | |
| ३९ | सांख्यिकी सहाय्यक | ५ | ० | ५ | ० | ० | ४ | ४ | |
| ४० | वरिष्ठ लिपिक | १०२ | ० | १०२ | ० | ० | ८१ | ८१ | |
| ४१ | सांख्यिकी अन्वेषक | १८ | ० | १८ | ० | ० | १४ | १४ | |
| ४२ | यांत्रिकी (मत्स्यालय) | १ | ० | १ | ० | ० | १ | १ | |
| ४३ | ग्रंथपाल | १ | ० | १ | ० | ० | १ | १ | |
| ४४ | दूरध्वनी चालक | १ | ० | १ | ० | ० | १ | १ | |

| अ. क्र. | संवर्ग पदनाम | एकूण पदे | कायम पदे | फेब्रुवारी अखेर तीन किंवा अधिक वर्षे पूर्ण होणारी व कायम स्वरुपाच्या दीर्घकाळ चालू राहणाऱ्या कामासाठी आवश्यक पदे | फेब्रुवारी अखेर १ वर्षाहून अधिक परंतु ३ वर्षापेक्षा कमी काळ अस्तित्वात असलेली पदे | बाकीची पदे | ४,५,६ स्तंभातील एकूण पदांच्या ८० टक्के पदे | कायम करावयाची पदे (स्तंभ ८ उणे स्तंभ ४) स्तंभ ५ मधील संख्येपेक्षा अधिक नसावी | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| ४५ | कनिष्ठ लिपिक | १५० | ० | १५० | ० | ० | १२० | १२० | |
| ४६ | गोखपाल | २ | ० | २ | ० | ० | २ | २ | |
| ४७ | वसुली सहाय्यक | ३ | ० | ३ | ० | ० | २ | २ | |
| ४८ | मत्स्यक्षेत्र प्रगणक | १७ | ० | १७ | ० | ० | १४ | १४ | |
| ४९ | वाहनचालक | ४७ | ० | ४७ | ० | ० | ३८ | ३८ | |
| ५० | क्षेत्र समन्वयक | २ | ० | २ | ० | ० | २ | २ | |
| | एकूण गट अ + ब + क | ७२२ | ० | ७२२ | ० | ० | ५७६ | ५७६ | |
| ५१ | मत्स्यक्षेत्रिक | १७५ | ० | १७५ | ० | ० | १४० | १४० | |
| ५२ | मत्स्यालयपाल | ९ | ० | ९ | ० | ० | ७ | ७ | |
| ५३ | नाईक | २ | ० | २ | ० | ० | २ | २ | |
| ५४ | दफ्तरी | १ | ० | १ | ० | ० | १ | १ | |
| ५५ | रोनिओचालक | २ | ० | २ | ० | ० | २ | २ | |
| ५६ | शिपाई | १२५ | ० | १२५ | ० | ० | १०० | १०० | |
| ५७ | पहारेकरी | २ | ० | २ | ० | ० | २ | २ | |
| ५८ | हमाल | २ | ० | २ | ० | ० | २ | २ | |
| ५९ | स्वच्छक | १ | ० | १ | ० | ० | १ | १ | |
| ६० | सुरक्षा रक्षक | ८ | ० | ८ | ० | ० | ६ | ६ | |
| ६१ | खानसामा | १ | ० | १ | ० | ० | १ | १ | |
| | एकूण गट ड | ३२८ | ० | ३२८ | ० | ० | २६४ | २६४ | |
| | एकूण गट अ+ब+क+ड | १०५० | ० | १०५० | ० | ० | ८४० | ८४० | |